सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात "३६०४" **स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे-भारीत-मागणी क्रमांक एल -५- २००- भारित (०१) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १५८ अन्वये जिल्हा परिषदांना** मुद्रांक शुल्क (३६०४०३०७) अनुदानाकरीता दुसरे वितरण.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीजीटी २०१५/प्र.क्र.४० / वित्त-३

बांधकाम भवन,मर्झबान रोड,
फोर्ट-१,मुंबई-४००००१.
तारीख: **१९ जानेवारी,२०१६.**

वाचा :-

१) शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३,दिनांक १७ एप्रिल,२०१५.
२) शासन निर्णय क्रमांकः बीजीटी -२०१५/प्र.क्र.४१/वित्त-३, दिनांक -१४/५/२०१५.
३) शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३,दिनांक१२ जानेवारी,२०१६.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम १५८ अन्वये जिल्हा परिषदांना एक टक्का मुद्रांक शुल्क अनुदान देय आहे. त्यामुळे हे अनुदान देता यावे म्हणून सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाकरीता एकूण रुपये ५८०,००,००,०००/-(रुपये पाचशे ऐंशी कोटी फक्त) एवढी अंदाजपत्रकीय तरतुद केली आहे.

२. वित्त विभागाच्या परिपत्रक क्र. अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३,दिनांक १७ एप्रिल,२०१५ अन्वये आवश्यक असणारा योजनेतर अर्थसंकल्पीत निधी ७०% च्या मर्यादेत वितरण करण्यास मान्यता दिली आहे.त्यानुसार सदर तरतुदीपैकी माहे एप्रिल २०१५ ते नोव्हेंबर २०१५ या आठ महिन्यांकरीता आवश्यक असणारा योजनेतर अर्थसंकल्पीत निधी **रु. ४०६,००,००,०००/- (रुपये चारशे सहा कोटी फक्त)** एवढी रक्कम मंजूर झाली आहे.सदर रक्कम सर्व संबंधीत जिल्हा परिषदांना वितरीत करण्यासाठी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक निरीक्षक, पुणे यांच्याकडे संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक- बीजीटी -२०१५/प्र.क्र.४१/वित्त-३, दिनांक -१४/५/२०१५ व्दारे सुपूर्द करण्यांत आली आहे.

३. आता वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३,दि.१२ जानेवारी,२०१६ अन्वये अर्थसंकल्पीत निधी खर्च करण्याची मर्यादा ८५% एवढी विहीत करण्यांत आली आहे. त्यानुसार उर्वरीत कालावधीसाठी मुद्रांक शुल्क अनुदान रु.८७,००,००,०००/- (रुपये सत्याऐंशी कोटी फक्त) एवढे अनुदान वितरीत करण्यांत येत आहे. अशाप्रकारे आतापर्यंत मुद्रांक शुल्क अनुदानाकरीता रु. ४९३,००,००,०००/-(रुपये चारशे त्र्याण्णव कोटी फक्त) वितरीत करण्यांत येत आहे. त्यांनी सदर रक्कम जिल्हा परिषदांना त्यांच्या वसूलीच्या प्रमाणात त्वरीत वितरीत करावी, वितरीत केलेल्या वितरण आदेशाच्या प्रती या विभागाकडे पाठवाव्यात. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या रकमेपेक्षा जास्त रकमा वितरीत होणार नाहीत याची दक्षता नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी घ्यावी.

४. ग्राम पंचायतीच्या क्षेत्राधिकारात झालेल्या स्थावर मालमत्तेच्या व्यवहारासंबंधात त्यांना अनुज्ञेय असलेल्या मुद्रांक शुल्क अनुदानाच्या ५०% रक्कम संबंधित जिल्हा परिषदांनी संबंधित ग्राम पंचायतीच्या ग्रामनिधीत जमा करण्याबाबत वर परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या अधिनियमातील कलम १५८(४) अन्वये असलेली तरतूद, तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क) अधिनियम, १९६१ मधील नियम १० मधील तरतूद विचारात घेऊन, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी या अनुदानाच्या मंजूरी आदेशात आवश्यक त्या अटी व शर्ती यांचा अंतर्भाव करावा.

५. जिल्हा परिषदांना हे अनुदान प्राप्त झाल्यानंतर अनुदान प्राप्त झाल्याचा दिनांक व मिळालेली रक्कम याबाबतची माहिती या विभागाकडे आणि नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अनुदानाचे ताळमेळ घालण्यासाठी पाठवावी.तसेच सर्व जिल्हा परिषदांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेले ग्रामपंचायतीचे मुद्रांक शुल्क अनुदान प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पुढील १५ दिवसांच्या आत संबंधीत ग्रामपंचायतीकडे विहीत कार्यपध्दती नुसार सुपुर्द करावे, व त्याचा अनुपालन अहवाल आयुक्तांकडे तसेच शासनाकडे सादर करावा.विभागीय आयुक्तांनी देखिल सदरचे अनुदान विहीत कार्यपध्दतीनुसार व विहित कालावधीत ग्रामपंचायतींना जिल्हा परिषदेकडून उपलब्ध होत आहे किंवा कसे याचा आढावा घ्यावा.

६. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी जिल्हा परिषदांना मंजूर केलेल्या व संबंधित शिर्षाखाली खर्ची पडलेल्या रक्कमेबाबतची माहिती शासन परिपत्रक,ग्राम विकास विभाग क्रमांक आरसीएन-१०८९/प्र.क्र.३०२७/२८, दिनांक ५ सप्टेंबर, १९९० ला जोडलेल्या विहीत प्रपत्रात भरुन या कार्यासनाकडे पाठवावी.

७. या बाबीवर होणारा खर्च मागणी क्रमांक एल-५" ३६०४ स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे, २०० इतर संकिर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहंस्ताकित रक्कमा देणे. (०१)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १५८ अन्वये जिल्हा परिषदांना मुद्रांक शुल्क अनुदान भारीत (एक) ५० इतर खर्च (३६०४०३०७)" या लेखाशिर्षाखाली दाखवावा व सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षासाठी अधिनस्त

ठेवलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा. हा शासन निर्णय प्राप्त झाल्याची पोच हया विभागास पाठविण्यात यावी.

८. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि.१२ जानेवारी,२०१६ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१६०११९१५३७२६६५२०** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=241eb93ab449def8114b5fbff2ea51ab0f16e0092f0102aa9502d0457228dd65, cn=Pandurang Rawaji Khotare
Date: 2016.01.20 10:29:39 +05'30'

(पां.रा.खोटरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. नोंदणी,महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. महालेखापाल-१ महाराष्ट्र राज्य,मुंबई ,(लेखा व परिक्षण)
३. महालेखापाल-२ महाराष्ट्र राज्य,नागपूर, (लेखा व परिक्षण)
४. महालेखापाल-१ महाराष्ट्र राज्य,मुंबई ,(लेखा व अनुज्ञेयता)
५. महालेखापाल-२ महाराष्ट्र राज्य,नागपूर, (लेखा व अनुज्ञेयता)
६. निवासी लेखा अधिकारी, लेखा व अधिदान कार्यालय, मुंबई
७. सर्व विभागीय आयुक्त,
८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
११. उपसंचालक लेखा व कोषागारे, कोकण भवन नवी मुंबई ,बेलापूर/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
१२. महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई,
१३. वित्त विभाग (व्यय १५) (बीयुडी-१६) व अर्थोपाय कार्यासन, मंत्रालय,मुंबई,
१४. मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई, बेलापूर ,
१५. उप मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा, कोकण भवन/बेलापूर/ नाशिक/ पुणे/ औरंगाबाद /अमरावती/नागपूर

१६. कार्यासन क्रमांक-वित्त-१, वित्त-७ व वित्त-८, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
१७.निवड नस्ती वित्त-३ ग्रा.वि. व ज.सं.वि.